MHKO050022992014

**नियमित दिवाणी दावा क्र.७१/२०१४ मधील**
**निशाणी क्र.५८ खालील आदेश**
**श्रीमती वंदना वजीर कांबळे विरुध्द श्री.उल्हास दत्तात्रय सुर्यवंशी**

प्रस्तुत प्रतिवादी क्र.३ ते ८ तर्फे अर्ज असा की, सदरचे काम आज रोजी वादीच्या उलटतपासावर नेमले होते. सदर प्रतिवादीतर्फे वकिलांचे काम मा.पटवेसो इचलकरंजी यांचे कोर्टात चालू होते. त्यावेळी सदर कामी पुकारा झालेला होता. प्रतिवादी हे आपले वकिलांना बोलवण्याकरीता मेन बिल्डींग कोर्ट इचलकरंजी या ठिकाणी गेल्यामूळे सदर कामी पुकारत्यावेळी हजर राहता आले नाही व मा.कोर्टाचा त्यावेळी नो क्रॉस चा आदेश पारित झाला आहे. तरी सदर कामी झालेला आदेश सेटअसाईड व्हावा व उलटतपासत घेण्यास परवानगी मिळावी, अशी त्यांनी विनंती केली.

२. वादी यांनी सदर अर्जावर म्हणणे दाखल केले आहे. त्यांच्या म्हणण्यानूसार वादी यांनी दि.२९/०१/२०१९ रोजी सरतपासाचे ॲफिडेव्हीट या कामी दाखल केले असून सदर प्रतिवादी यांनी सन २०१९ पासून उलटतपास घेणेस चालढकल केली आहे व सदरचे काम लांबविण्याच्या हेतूने येनकेन प्रकारे जाणूनबूजुन विलंब केला असल्याने प्रतिवादी यांचा अर्ज खर्चासह नामंजूर करण्यात यावा, अशी त्यांनी विनंती केली.

३. दोन्ही पक्षांचा युक्तीवाद ऐकला. अभिलेखावरील कागदपत्रे पाहिली.

४. दाव्यातील अभिलेख पाहिला असता असे दिसून येते की, सदरचे प्रकरण हे गुणवत्तेवर निकाली काढण्याकरीता व नैसर्गिक न्यायतत्वास अनुसरुन दोन्ही पक्षांना त्यांची बाजू मांडण्याची संधी मिळणे आवश्यक आहे. करीता अर्जातील

नमूद कारण विचारात घेवून सदरचा अर्ज मंजूर करणे न्यायोचित होईल. तसेच झालेल्या विलंबा करीता कॉस्ट लावणे न्यायोचित होईल. करीता मी खालीलप्रमाणे आदेश पारित करीत आहे-

**आदेश**

१. सदरचा अर्ज मंजूर करण्यात येतो.

२. प्रतिवादी क्र.३ ते ८ यांनी वैयक्तीक किंवा संयूक्तीकरीत्या एकूण रुपये ३००/- इतकी कॉस्ट वादी यांना देण्यात यावी.

Digitally signed by MRUNMAYEE M CHOUDHARY
Date: 2023.10.03 17:15:05 +0530

**ठिकाण - इचलकरंजी** **(एम.एम.चौधरी )**
**दिनांक - ०३/१०/२०२३** **४ थे सह दिवाणी न्यायाधीश,क.स्तर,**
**इचलकरंजी.**